


Scanned by CamScanner



इतिहासाचार्य वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे

## विद्यमान पदाधिकारी व कार्यकारी मंडळ

| | |
|---|---|
| मा. श्री. मदनलाल मिश्रा | अध्यक्ष |
| श्री. आनंद राजवाडे | प्रमुख मार्गदर्शक |
| मा. दलूभाऊ जैन | उपाध्यक्ष |
| श्री. संजय मुंदडा | कार्याध्यक्ष |
| श्री. लखनजी भतवाल | कार्योपाध्यक्ष |
| श्री. प्राचार्य डॉ. सर्जेराव भामरे | मुख्य चिटणीस |
| श्री. व्यंकटेश दाबके | खजिनदार |
| श्री. प्रा. सुनिल मुंदडा | वस्तु संग्रहालय चिटणीस |
| प्रा.डॉ. सौ. मृदुला वर्मा | संशोधक त्रैमासिक चिटणीस |
| श्रीमती जयश्री शहा | ग्रंथालय चिटणीस |
| प्रा.डॉ. सौ. उज्वला नेहते | संशोधन व प्रकल्प चिटणीस |
| प्राचार्या डॉ. सुनंदा अहिरे | संशोधन अधिकारी |
| सौ. लता आगीवाल | कार्यकारी सदस्य |
| प्रा.श्री.श्रीपाद नांदेडकर | क्युरेटर (पदसिद्ध) |

Scanned by CamScanner

ISSN No. 2394-5990

इतिहासाचार्य वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे
या संस्थेचे त्रैमासिक

# ।। संशोधक ।।

पुरवणी अंक – मार्च २०२२ (त्रैमासिक)

● शके १९४३ ● वर्ष : ९० ● अंक : ६

संपादक मंडळ

● प्राचार्य डॉ.सर्जेराव भामरे ● प्रा.डॉ.मृदुला वर्मा ● प्रा.श्रीपाद नांदेडकर
सहसंपादक : डॉ.अर्जुन नेरकर व डॉ.संजय खैरनार; डॉ.राजेंद्र त्रिभुवन.

※ प्रकाशक ※

श्री. संजय मुंदडा

कार्याध्यक्ष, इ.वि.का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे ४२४००१.
दूरध्वनी (०२५६२) २३३८४८

कार्यालयीन वेळ
सकाळी ९.३० ते १.००, सायंकाळी ४.३० ते ८.०० (रविवार सुटी)

मूल्य ₹ १००/-
वार्षिक वर्गणी ₹ ५००/-; आजीव वर्गणी ₹ ५०००/- (१४ वर्षे)

विशेष सूचना : संशोधक त्रैमासिकाची वर्गणी चेक/ड्राफ्ट ने
'संशोधक त्रैमासिक राजवाडे मंडळ, धुळे' या नावाने पाठवावी.

अक्षरजुळवणी : अनिल साठये, बावधन, पुणे 21.

मुखपृष्ठावरील चित्र :

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकेच्या प्रकाशनार्थ अनुदान दिले आहे. या नियतकालिकेतील लेखकांच्या विचारांशी मंडळ व शासन सहमत असेलच असे नाही.

Scanned by CamScanner

# अनुक्रमणिका


१ ग्रामीण जीवन-व्यवहाराचे बदलते स्वरूप
- डॉ.गजानन भामरे, निमगाव, ता.मालेगाव ------- ०९

२ ग्रामीण साहित्यातील सामाजिकता
- श्री. वर्षा अहिरे/डॉ.सपना सोनवणे, मालेगाव - १५

३ दलित आत्मकथनातील समाज चित्रण
- प्रा.डी. ए. पाटील, शिरपूर, ता.धुळे ------- २०

४ डॉ.अ.वा.वर्टी यांच्या कथेतील ग्रामजीवनातून फुलणारा विनोद
- डॉ. अरूण पाटील, मालेगाव, जि.नाशिक ---------- २६

५ दलित कथाकार अण्णाभाऊ साठे
- डॉ.अर्जुन नेरकर, मालेगाव, जि.नाशिक------- ३१

६ दलित जाणीव चित्रण करणारी 'झूल' एक अभ्यास
- डॉ.सोमनाथ पावडे, सुरगणा, जि.नाशिक -------- ३७

७ दलित साहित्यातील सामाजिकता
- डॉ. वैशाली पाटील, चाळीसगाव ------------- ४४

८ दलित साहित्यातील वेगळेपण
- डॉ.सौ.मिनाक्षी पाटील, मालेगाव, जि.नाशिक --- ५३

९ आंबेडकरी चळवळीचे शिलेदार वामनराव गरूड
- डॉ. स्वप्नील गरुड, देवळा, जि.नाशिक --------- ५८

१० ग्रामीण साहित्याची चळवळ
- डॉ. किरण पिंगळे ---------------------- ६७

११ साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त मराठी ग्रामीण कादंबरीतील स्त्री समाजजीवन
- डॉ.सुरेखा जाधव, निफाड, जि.नाशिक ------- ७५




Scanned by CamScanner

 ISSN No. 2394-5990

# दलित कथाकार – अण्णाभाऊ साठे

– डॉ. अर्जुन नेरकर, मालेगाव, जि.नाशिक

दलित समाज हा सामाजिक विषमतेने नाडलेला आणि पिळला गेलेला आहे. हजारो वर्षापासून त्यांच्यावर अन्याय-अत्याचार होत आहेत. रूढी-परंपरेच्या चौकटीमध्ये त्यांना बंदिस्त करून माणूस म्हणून त्यांचे अस्तित्व नाकारले गेले. त्यांना जनावरांप्रमाणे वागवले गेले, पशुंना जवळ घेतले जाते, परंतु दलितांना जवळ घेतले गेले नाही, त्यांची सतत उपेक्षा केली, गुलाम म्हणून वागवले गेले, त्यांचे सर्व प्रकारे शोषण होत गेले. अण्णाभाऊ साठे यांनी जवळपास २१ कथासंग्रह लिहून तत्कालीन सामाजिक परिस्थितीवर आपल्या लेखणीच्या माध्यमातून प्रकाश टाकण्याचे काम केले. यात कृष्णाकाठच्या कथा, गजाआड, नवती, खुळवाडी, आबी, पिसाळलेला माणूस, फरारी, बरबाद्या कंजारी, निखारा, चिरानगरची भुतं, इत्यादी गाजलेले कथा संग्रह. अण्णा भाऊंची कथा नवयुग' मधून प्रसिद्ध झाली. केवळ तिसरीपर्यंत शिकलेला हा युवक सांगली-सातारा परिसरातून पायी चालत पोट भरण्यासाठी मुंबई महानगरात आला. त्यावेळी बाबासाहेबांच्या चळवळीमुळे मुंबई ही दलितांच्या चळवळीचे केंद्र बनली होती. मात्र अण्णाभाऊ या चळवळीत सामील झाले नाहीत. सुरुवातीला अण्णाभाऊ कम्युनिस्ट पक्षाचे सदस्य होते. माणुसकीसाठी आणि पोटासाठी बेभान झालेल्या माणसाच्या जीवनाचे चित्रण अण्णा भाऊंनी केले आहे. आधीच्या मराठी कथेत दलित हा लाचार, दीनदुबळा, अन्याय सहन करणारा, म्हणून रेखाटला जात होता. अण्णाभाऊंनी तो बंडखोर आणि क्रांतिकारक रेखाटला आहे. १९५७ मध्ये खुळवाडी' हा पहिला मराठी कथा संग्रह प्रकाशित झाला. या कथासंग्रहातील नायक-नायिका दलित असून दारिद्र्यामुळे त्यांची नेहमी उपासमार होते. परंतु भुकेसाठी ते लाचार होतांना दिसत नाहीत. या दीन-दलितांवर अन्याय अत्याचार करणारे जमीनदार व इनामदार कसे संपतील याचाच विचार या कथेत प्रकट केला आहे.

अण्णाभाऊंच्या कथेमधून ते जीवन जगले, पाहिले, अनुभवले, तेच त्यांनी



Scanned by CamScanner

त्यांच्या कथेमधून अधोरेखित केले आहे. म्हणून ते म्हणतात, मला कल्पनेचे पंख लावून भरारी मारता येत नाही. याबाबतीत मी स्वतःला बेडूक समजतो.[१] आता काळ बदलला आहे. माणसाकडे पाहण्याची दृष्टीही बदलून गेली आहे. अण्णा भाऊंची कथा भावविवश होत नसली तरी ती अधून मधून लाल तत्वज्ञानाच्या साम्यवादी विचाराच्या आहारी जाते. अण्णाभाऊ समाजाच्या अत्यंत खालच्या स्तरातून आले होते. या समाजाचे दुखणे, त्यांच्या वेदना त्यांनी अनुभवल्या होत्या. असे नारायण सुर्वे म्हणतात.[२] अण्णाभाऊंच्या लेखनीमध्ये प्रामाणिकपणा, संघर्ष, मेहनत, स्वाभिमान, पोट भरलेला दिसून येतो. त्यांच्या कथांमधील संघर्ष हा शोषक विरुद्ध शोषित कसा आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची प्रेरणा घेऊन उपेक्षित, शोषितांना, न्याय देण्याचे काम अण्णाभाऊ साठे यांनी केले आहे. अण्णा भाऊंची कथाही नैराश्यातून संघर्षा कडे आणि संघर्षातून परिवर्तनाकडे नेते.

अण्णा भाऊंनी ऐतिहासिक, मनोविश्लेषणात्मक आणि विनोदी कथाही लिहिल्या आहेत. 'थड्यातील हाड' या कथेमधून त्यांनी संपूर्ण अस्पृश्य वर्गाचा इतिहास उलगडून दाखविलेला आहे. अण्णाभाऊंच्या राजकीय कथेच्या संदर्भामध्ये भालचंद्र फडके म्हणतात,– 'अण्णाभाऊंची कथा भावविवश होत नसली, तरी ती अधून मधून लाल तत्वज्ञानाच्या हरी जाते एक तर अण्णाभाऊ राजकीय पक्षाशी संपूर्ण संबंधित होते आणि त्यामुळे राजकीय पक्षाच्या विचारसरणीचा प्रभाव त्यांच्या लेखनावर असणे अपरिहार्य होते.'[३] अण्णाभाऊंच्या चिरागनगरीची भूतं' या कथेमधील मानसशास्त्रीय दुःख वाचकाला अस्वस्थ करते. झोपडपट्टीत राहणारी माणसं, डोक्यावर छप्पर नसलेली माणसं, संडास वगैरे सुविधांपासून उपेक्षित असणारी माणसं, किती भयाण आयुष्य जगतात, हे अण्णा भाऊंनी आपल्या कथेमधून उलगडून दाखवले आहे. तसेच अण्णा भाऊंनी लिहिलेल्या 'काळे मास्तर' या कथेत मनोविश्लेषणाचे दर्जेदार कथन आहे. 'भोमक्या' या कथेत अण्णाभाऊंनी विनोदाचा साक्षात्कार घडवला आहे.

अण्णाभाऊंची भाषाशैली अतिशय रंजक आणि मनाला भेदून जाणारी आहे. त्यांच्या साहित्यात म्हणी आणि वाक्प्रचार याचा वापर खूप मोठ्या प्रमाणात पाहायला मिळतो. त्यामुळे त्यांचे साहित्य परिणामकारक आणि प्रभावी होते.



Scanned by CamScanner

ISSN No. 2394-5990

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे विचार अण्णासाहेबांच्या नसानसात भिनलेले पाहायला मिळतात. याची प्रचिती 'मरीआईचा गाडा' या कथेतून आंबेडकरांच्या आंदोलनाची प्रतिमा दिसते. परिवर्तनाशी नाते सांगणारी आणि सामाजिक आंदोलनाची प्रेरणा देणारी अण्णा भाऊंची ही कथा आहे. अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य हे परिवर्तनाला दिशा व चालना देणारे ठरले आहे. महाराष्ट्राच्या एकूणच जडणघडणीत आणि परिवर्तनात अण्णाभाऊंच्या साहित्याचे योगदान हे महत्त्वपूर्ण ठरलेले आहे. अजरामर अशा या साहित्याने उपेक्षितांच्या अंतरंगाचा वेध घेण्याचा प्रयत्न केला आहे. आजही मोठ्या संख्येने विद्यार्थी व अभ्यासक त्यांच्या साहित्याचा संशोधनात्मक अभ्यास करताना दिसतात. संयुक्त महाराष्ट्राची चळवळ लोकमानसात रुजविण्याची महत्त्वपूर्ण काम शाहीर अण्णाभाऊ साठे यांनी केले आहे. मुंबई, मराठवाडा, विदर्भ, कोकण, पश्चिम महाराष्ट्र, यांच्यासह सीमा प्रदेशातील विविध भागातील हजारो ठिकाणी शाहिरांनी आपल्या लाल बावटा कला पथकाचे कार्यक्रम सादर केले. त्यामुळे अण्णाभाऊ लोक प्रेरित झाले.

अण्णाभाऊ साठे हे जातीय आणि वर्गीय अशा दोन्ही प्रकारच्या विषमतांचा विचार करणारे लेखक होते. या भेदभावपूर्ण सामाजिक वास्तवात स्त्रियांच्या दहशतवादाच्या प्रश्नांची चर्चा ही अण्णा भाऊंनी आवर्जून केली आहे. त्यांच्या व्यापक दृष्टिकोनामुळे त्याचे साहित्य वैशिष्ट्यपूर्ण ठरते. डॉ.नंदा तायवाडे म्हणतात, 'अण्णाभाऊ साठे हे साम्यवादी, आंबेडकरवादी अशा व्यामिश्र व मानवतावादी विचार परंपरेची पताका खांद्यावर घेऊन निघालेले पांथस्थ. आपापली दार्शनिक मूल्ये सांभाळून कथा-कादंबरी वांङ्मयातून त्यांनी नव्या यंत्रयुगातील नव्या मानवाचा ध्यास व शोध घेतलेला दिसून येतो. महानगरीय तसेच ग्रामीण संवेदना व जीवन जाणिवा, दलित-श्रमिक वर्गाची जगण्याची धडपड व आकांक्षा यांचे सूक्ष्म रोपण कथा वागण्याच्या प्रांतात या शिलेदाराने सशक्तपणे केलेले आहे'.[४] अण्णाभाऊंच्या कथेत किंवा लिखाणात विनोद नसतो असे नाही. पण त्यांच्या प्रकृती धर्म आहे गंभीर लेखकाचा. ज्यांन फार भोगलं आहे. सात पडद्यातून नव्हे, तर समोरासमोर जीवनातल्या क्रूर सत्यचं ज्याला दर्शन घडले आहे. अशा पोटतिडकीने लिहिणाऱ्या साहित्यिकांचा आत्मा अण्णाभाऊ साठे यांना लाभला



Scanned by CamScanner

आहे. म्हणून सहाजिकच त्यांच्या गोष्टी मोठ्या वैशिष्ट्यपूर्ण असतात. तत्कालीन सर्व बड्या कथाकारांपेक्षा ते निराळे आहेत. या लेखकाला प्रतिभेचे देणे लाभलं आहे. जीवनात आग ओकणाऱ्या हरतरेच्या गोष्टीचा अनुभव त्यांच्या गाठीशी आहे. त्यांच्या मनात एक प्रकारचा पीळ आहे. ते अन्यायाविरुद्ध बंड उभारणाऱ्या वृत्तीचे पूजक आहे.

दलित आणि कामगारांच्या जीवनातील सत्य परिस्थिती व्यक्त करण्यासाठी अण्णाभाऊ साठे यांनी कथांचा वापर केला. पृथ्वी ही शेषनागाच्या मस्तकावर तरलेली नसून दलित व कामगार लोकांच्या तळहातावर चाललेली आहे. असे अण्णाभाऊ १९५८ मध्ये, मुंबई मध्ये स्थापन केलेल्या दलित साहित्य संमेलनात उद्घाटनपर भाषणात म्हणाले होते. अण्णाभाऊंच्या भाषणाचे खास वैशिष्ट्य म्हणजे ते लेखकांना उद्देशून म्हणतात, 'हा दलित आजच्या समाजाचे रुदय आहे.... हा माणूस कष्टा सारखे खडतर कर्म का करतो हे जोपर्यंत लेखकाला कळत नाही, तोपर्यंत तो दलितांचे साहित्य निर्माण करू शकत नाही. तो या वर्गाशी एकनिष्ठ असावा लागतो. तो लेखक ध्येयवादी असला पाहिजे त्याची कल्पकता सुद्धा अशीच हवी. याची जाणीव करून द्यावी आणि त्यासाठी लेखक हा सदैव जनतेबरोबर असतो त्याच्याबरोबर जनता असते? बर लेखक साहित्यिकांना कष्टकऱ्यांचे खडतर आयुष्य समजून घेण्यासाठी अण्णाभाऊ सांगतात, 'इंच विद्युत मय मनोरे उभे राहून विजेच्या तारा जोडतो, खाणीत उभ्या कड्यावर चढून सुरुंगाना पेट देतो किंवा पोलादाच्या करणाऱ्या भट्टीवर तो निर्भय वावरतो आणि.... कधीकधी त्याची मृत्यूची गाठ पडून हा दलित कष्ट करत मरण पत्करतो. ही जगण्याची नि मरण्याची आगळी रीत लेखकाने समजून घ्यावी.' अण्णा भाऊंच्या कथांमधील माणसे ही वास्तवातली आहेत. त्यांना कोणी विचारले की माणूस कसा हवा? तर ते म्हणाले असते माणूस दुःखाचे डोंगर फोडणारा, जिद्दीचा हवा. त्यांच्या अंतकरणात बंडखोरी वसत होती तीच बंडखोरी त्यांच्या कथांमधील माणसात आहे. ही माणसे मढया सारखी नाहीत. जो बैल चुचकारून चालत नाही, त्याला पराणी टोचून पळायला लावणारी ही माणसे आहेत. तलवार, बंदुका इत्यादी शस्त्रे त्यांना काबूत ठेवू शकत नाही. दुःखा पुढे हसत उभी राहतात.



Scanned by CamScanner

दुःखाकडे पाठ फिरवीत नाहीत. निरांजनाच्या मंद ज्योतीप्रमाणे शांत जीवन जगणारी ही माणसे वेळ पडली तर पावसाळ्यात कसपटा प्रमाणे हत्तीला ओढून नेणाऱ्या वारणा नदी सारखी प्रक्षुब्ध होऊ शकतात. कारण या सर्व कथा अंतर्गत व्यक्तींना या सर्व कथा अंतर्गत व्यक्तींना घडवणार लेखक आयुष्याची सर्व परवड कलंदरी वृत्तीने व जिद्दीने झेलणारा होता.

अण्णांची जिद्द आणि त्यांचा एकलक्षीपणा त्यांच्या लेखनामागे आहे. सरकारचे लष्कर पाठीवर घेऊन मी आता स्वराज्याच्या भानगडीत आहे. असे अभिमानाने म्हणणारा आणि अखंड मृत्यूशी झुंजणारा नसरू (जिवंत काडतूस) हा सह्याद्री पेक्षाही अण्णाभाऊंना मोठा वाटतो. झूजता झूजता मरण आले तर कृतार्थ होईल अशी त्याची भावना आहे. तलवार ही नेक कामासाठी सुधारली पाहिजे आणि मारली पाहिजे' असे म्हणणारा सावळा मांग हुंड्याची रक्कम चूक केली नाही म्हणून काशीचा संसार उधळून टाकणाऱ्या राजाराम पाटलाला जरब बसवतो आणि काशीचा संसार सोन्याचा करून देतो. (सावळा मंग) अण्णा भाऊंच्या सर्वच कथांमधील व्यक्तींना पोटाची चिंता आहे. या सर्व व्यक्ती आर्थिक दृष्ट्या सर्वात खालच्या स्तरातील आहे. माणसे आपापल्या पद्धतीने पोट जाळण्यासाठी धडपडत आहेत. त्यांच्या कथेतील भुकेचे दुःख केवळ एखाद्या व्यक्तीचे नाही. भुकेने तडफडणाऱ्या, अर्धपोटी राहणाऱ्या समाजाचे ते दुःख आहे. तुरुंगात डांबलेला सुलतान सुद्धा म्हणतो, मला पोटभर हवे मी पोटासाठी लढणार. (सुलतान) अण्णाभाऊंच्या कथातून वावरणारी माणसे दलित घराण्यातील आहेत आणि त्यांची मनी आता पूर्वीप्रमाणे मुर्दाड राहिलेली नाहीत. आता महारांनी एकाएकी मेलेली ढोरे ओडण्याचे काम बंद केल्यावर वाडे चिडून महारांना नाहीसे करण्याची भाषा बोलू लागतात. 'महारांनी पायरी सोडली, त्येस्नी आता गावचा इंगा दाखवू' असे म्हणणारे पाटील गावोगावी आहेत.

अण्णाभाऊंची कथा जशी पारंपारिक, जुन्या वळणाची. ते एका पुढे एक घटना मांडीत जातात आणि त्यातून एकात्म परिणाम साधतात. त्यांचे लक्ष एखाद्या व्यक्तीवर केंद्रित असते. त्यांच्या जीवन संघर्षाची कथा अण्णाभाऊ रंगवत जातात. म्हणून ते म्हणतात, माझी जीवनात निष्टा असून मला माणसं फार



Scanned by CamScanner

आवडता. त्यांची सर्व शक्तिमान आहे. ती जगतात, जगाला जगवतात. त्यांच्या बळावरच हे जग चालते. त्यांची झुंज आणि त्यांचे यश यावर अण्णाभाऊंचा दृढ विश्वास आहे. त्यांना नायकाला विद्रूप करणे आवडत नाही. या माणसांना वैफल्याच्या नावाखाली विद्रूप करून नये. वैफल्य हे तलवारीच्या धुरीसारखं असतं नि ती धूळ झटकून तलवार लखलखीत करता येते. अशाप्रकारे अण्णाभाऊंच्या कथेतून सफलतेचे दर्शन घडवल्या शिवाय राहत नाही. ग्रामीण जीवनाचे आणि दारिद्र्याने पिडलेल्या मुंबईच्या गलिच्छ वस्त्यांमध्ये राहणाऱ्या व्यक्तींची अत्यंत बोलके आणि जिवंत चित्र अण्णाभाऊ साठे यांनी रेखाटले आहे. त्याला तोड नाही.

संदर्भ :-

१. दलित साहित्य वेदना व विद्रोही –भालचंद्र फडके (१– पृष्ठ क्रमांक १८०)(२– पृष्ठ क्रमांक १८१)(५–पृष्ठ क्रमांक १८५)

२. दलित साहित्याचा इतिहास– प्राचार्य डॉ.म.सु. पगारे (३–पृष्ठ क्रमांक ११०)

३. ग्रामीण – दलित साहित्य: चळवळ आणि समीक्षा – डॉ. मधुकर मोकाशी

४. विकिपीडिया – mr.m.wikipediy.org/wiki/.

* * *



Scanned by CamScanner